# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०१/२०२३ (मंगळवार) दुपार**

---

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर जैनमंदीर कडे प्रतिभा स्तली, ज्ञानोदय विदयापीठ रामटेक येथे दिनांक १५/०१/२०२३ चे १८:३० वा. पासून ते दि. १६/०१/२०२३ चे १०:०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— विनोद वसंतराव भोयर, वय ४३ वर्ष, रा. समुद्रपुर जिल्हा वर्धा यांचे सध्या रामटेक येथे मागील महीन्यापासुन जैनमंदीर कडे प्रतिभा स्तली, ज्ञानोदय विदयापीठ रामटेक येथे काम चालु असुन त्याचेकडे २५ कामकरी मजुर आहेत फिर्यादीच्या कामाकरीता लागणारे लोखंडी जॅक पाईप (prpo2*2) सटरींग शिव सटरींग स्टोअर नागपुर येथुन किरायाने २०० लोखंडी जॅक पाईप (prpo2*2) आणले असुन त्याची कींमत २,७०,०००/— रूपये असुन त्या पैकी ३० नग लोखंडी जॅक पाईप प्रत्येकी किंमती ७५० रूपये प्रमाणे २२५००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील पोलीस नायक योगेश भुरे, ब. नं. ६७३ मो. नं. ८३२९५३७३६१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील धनी मौदा येथे दिनांक १५/०१/२०२३ चे १६.०० वा. ते १६.३० वा. दरम्यान यातील मोटरसायकल क्र. एम.एच— ४०/ क्यु—३३१८ चा चालक आरोपी नामे— अविनाशी भोंडे रेवराल मौदा अरोली रा. रेवराल ता. मौदा जि. नागपूर ने आपले ताब्यातील भरधाव वेगाने व निश्काळजीपणे चालवुन मोसा क्र एमएच—४० एएच—७३६४ ला मौजा धनी गावात जोरदार धडक मारल्याने अपघातात मोटरसायकल स्वार राजु खडसे व पुतण्या मार्शल खडसे हे रोडवर खाली पडले त्यातील राजु खडसे गंभीर जखमी होवुन धानी गावातील लोकांनी उचलुन त्यास चौधरी हॉस्पीटल कामठी येथे उपचाराकरिता घेवुन गेले राजु खडसे हा उपचारादरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिनेश रधुनाथ खडसे, वय २७ वर्ष यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अरोली येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवि. सहकलम १८४ एमव्ही एक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक हंसराज वरखडे पोस्टे मो. नं ९३७००३१६४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील पारडसिंगा ग्रामपंचायत कार्यालय ता. काटोल येथे दिनांक १६/०१/२०२३ चे ०६.३० वा. ते ०८.३० वा. दरम्यान ट्रक क्रमांक सीजी–०८/एटी–२६५१ चा चालक याने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवून ग्रामपंचायत पारडसिंगा येथील ग्रामपंचायतचे समोरील रोडवरील लोंखंडी बॅरिगेट्स व ग्रामपंचायतचे कंपांऊन्ड व ईमारतीला धडक दिल्याने ट्रक चालकाचा सोबती नामे–**राजेश परमानंद कुंजाम वय २५ वर्ष, रा. गोंडी टोला रावनवाडी जि. गोंदिया** हा ट्रक अपघातामध्ये मरण पावला व ट्रकचा चालक स्वत: गंभीर जखमी झाला आणि ग्रामपंचायत ईमारतीचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मुखरू मल्लाजी करेवार, वय ४३ वर्ष, रा. श्रीराम नगर काटोल ता. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८ ३०४(अ) भादवी १८४ मोवाका, सहकलम. ३(१) सार्व. संपत्ती नुकसान प्रति अधि. १९८९ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस हवालदार ब. नं. १७३२ ज्योती मो नं. ९७६५७७१९७७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**